| | |
|---|---|
| MHRT030014972025 | दाखल दिनांक : १२/०९/२०२५<br>नोंदणी दिनांक : १२/०९/२०२५<br>निकाल दिनांक: १०/०८/२०२६<br>कालावधी: ०० व. १० म. २९ दि. |

( भाग – "अ" )

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्रमांक –२, रत्नागिरी यांच्या न्यायालयात**

**( पिठासिन अधिकारी – श्रीमती शबनम युनूस शेख)**

**संक्षित फौजदारी खटला क्र.१०२७/२०२५** **नि.क्र.०७ लगत**

**महाराष्ट्र शासन तर्फे**
रत्नागिरी ग्रामीण पोलिस ठाणे,
ता. जि. रत्नागिरी .. **अभियोग पक्ष**

**अभियोग पक्षातर्फे:– सहा. सरकारी अभियोक्ता श्रीम. आर.एस.दळवी**

**– विरुध्द –**

**महेश रमेश चव्हाण,**
वय– ४५ वर्षे, व्यवसाय– व्यापार,
घर नं.२/३५६, साई संकल्प अपार्टमेंट,
बी–२, कुवारबांव,
ता.जि.रत्नागिरी ... **आरोपी**

**आरोपीतर्फे :– विधीज्ञ श्री.आर.के.चाचे**

( भाग – " ब " )

| अनु.क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| ०१. | गुन्हा घडल्याचा दिनांक | ०६/०८/२०२५ |
| ०२. | प्रथम खबर अहवाल दिनांक | ०६/०८/२०२५ |
| ०३. | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | १२/०९/२०२५ |
| ०४. | गुन्हयाचा तपशिल निश्चीत दिनांक | ०७/०४/२०२६ |
| ०५. | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १६/०७/२०२६ |
| ०६. | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | १०/०८/२०२६ |
| ०७. | न्यायनिर्णय सुनावणीचा दिनांक | १०/०८/२०२६ |

## आरोपीचा तपशिल

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक/नोटीस दिनांक | जामीन दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी भा.ना.सु.सं चे कलम ४६८ करिता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | महेश रमेश चव्हाण | भा.ना.सु.सं.कलम ३५(३) प्रमाणे नोटीस दिली. | लागू नाही | ६५ (ई) मुं.दा.का | निर्दोष | निर्दोष | लागू नाही |

अभियोगपक्षाचे/ बचाव पक्षाचे/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ). अभियोग पक्षाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | सचिन सुरेश गुरव | ०७ लगत | पंच |
| २. | सागर नामदेव खेत्री | ०७ लगत | पंच |
| ३. | पोलिस हवालदार<br>बाजीराव नारायण कदम | ०७ लगत | तपासिक अंमलदार |

ब). बचावपक्षाचे साक्षीदार जर असतील तर

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | -- | - | -- |

क). न्यायालयीन साक्षीदार असतील तर

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | -- | - | -- |

न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी

ड). अभियोगपक्ष

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | तपासाचे लेखी आदेश/अ.सा.क्र.०३ | १४ |
| २. | फिर्याद/अ.सा.क्र.०३ | १५ |
| ३. | प्रथम खबर अहवाल/अ.सा.क्र.०३ | १६ |

| | | |
|---|---|---|
| **४.** | पंचनामा/अ.सा.क्र.०३ | १७ |
| **५.** | जप्त मुद्देमाल रासायनिक तपासणीसाठी पाठविलेबाबतचे पत्र/अ.सा.क्र.०३ | १८ |
| **६.** | पोहोच पावती/अ.सा.क्र.०३ | १९ |
| **७.** | रासायनिक तपासणी अहवाल/अ.सा.क्र.०३ | २० |

**इ). भौतिक वस्तु**

| **अ.क्र.** | **भौतिक वस्तु क्रमांक** | **निशाणी** |
|---|---|---|
| १. | -- | -- |

## <u>न्यायनिर्णय</u>

(अधिघोषणा दिनांक :- १० ऑगस्ट, २०२६)

दोन्ही पक्षांतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाचा पुरावा आणि दोन्ही वकिलांचा युक्तीवाद लक्षात घेता माझेसमोर जे मुद्दे उपस्थित झाले ते मुद्दे त्यांच्या उत्तरांसह व त्या उत्तरांच्या कारणांसह खालीप्रमाणे :-

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक ०६/०८/२०२५ रोजी १४.२० वाजण्याच्या सुमारास मौजे खेडशी चांदसुर्या येथील महालक्ष्मी ट्रेडर्स जवळील माडी विक्री दुकानाचे पाठीमागे ता.जि. रत्नागिरी येथे आरोपी बेकायदेशीररित्या देशी- विदेशी बनावटी दारुच्या बाटल्या एकुण किंमत रुपये ३,६०५/- त्याच्या ताब्यात बाळगताना मिळुन आला व त्याद्वारे महाराष्ट्र दारुबंदी | **... नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला आहे ? | |
| २. | आदेश काय ? | **... आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

१) निशाणी क्रं.०१ वरील आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. तसेच आरोपीचा भा.ना.सु.सं.कलम ३५१ प्रमाणे जवाब नोंदविण्यात आला. त्यामध्ये आरोपीने अभियोग पक्षाच्या सर्व बाबी नाकारुन त्याच्याविरुध्द खोटा खटला दाखल केल्याचा बचाव घेतला आहे.

**मुद्दा क्रमांक १ व २ करीता :–**

मुद्दे क्र.१ व २ एकमेकांशी संलग्न असल्याने पुरावा व कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीत चर्चित आहे.

२) अ.सा.क्र.३/तपासिक अंमलदार यांनी त्यांच्या पुराव्यात प्रस्तुत गुन्हयाचा तपास कशाप्रकारे केला याबाबत कथन केले आहे. परंतु सदर साक्षीदाराच्या पुराव्यावर भिस्त ठेवण्यापूर्वी त्यांच्या उलट तपासाचे अवलोकन करणे देखील आवश्यक आहे. अभियोगपक्षाच्या साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासात घटनास्थळी बनावट ग्राहक पाठवून बातमीतील खबरची शहानिशा केली नव्हती व घटनास्थळ हे दाट लोकवस्तीचे व रहदारीचे ठिकाण आहे असे मान्य केले आहे. यावरुन घटनास्थळावर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उपलब्ध होण्याची

शक्यता नाकारता येत नाही. परंतु पुरेशी संधी देवूनही अभियोगपक्षातर्फे घटनेचा एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा पुरावा नोंदवण्यात आलेला नाही. त्यामुळे अभियोगपक्षाची कथने संशयास्पद दिसून येतात.

३) तसेच अभियोगपक्षाच्या पुराव्यात त्यांना गुप्त बातमी कुणाकडून मिळाली याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे फिर्यादी व साक्षीदारांना गुप्त बातमी मिळाली होती का याबाबत शंका निर्माण होते.

४) त्याचप्रमाणे अभियोगपक्षातर्फे गुन्हयामधील जप्ती सिध्द करण्यासाठी अ.सा.क्र.१ व २ यांच्या पुराव्यावर भिस्त ठेवण्यात आली. परंतु अ.सा.क्र.१ यांनी त्यांच्या पुराव्यात दि.०६/०८/२०२५ रोजी पोलीसांनी हातखंबा बाजूने जात असताना त्यांची एका कागदावर सही घेतली. तसेच कागदावर काय लिहीले होते हे त्यांना माहित नाही असे सांगून अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्याच प्रमाणे अ.सा.क्र.०२ यांनी त्यांच्या पुराव्यात दि.०६/०८/२०२५ रोजी ते हातखंब्याच्या येथे कामासाठी गेले होते. खेडशी येथे ते गर्दी बघून थांबले. तेथे पोलीसांनी त्यांना सही करायला सांगितले. त्यामुळे त्यांनी एका कागदावर सही केली. परंतु त्यामध्ये काय लिहीले होते हे त्यांना माहित नाही असे सांगून अभियोगपक्षास सहकार्य केले नाही.

५) त्यामुळे अभियोगपक्षातर्फे सदर साक्षीदारांना उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु त्यामध्ये देखील सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास उपयुक्त असे कोणतेही कथन मान्य केले नाही. त्यामुळे सदर साक्षीदारांचा पुरावा जप्ती व घटनास्थळ सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षास उपयुक्त नाही या मता प्रत मी आली आहे.

६) त्याचप्रमाणे अभियोगपक्षातर्फे निशाणी क्र.२० वरील रासायनिक तपासणी अहवालावर भिस्त ठेवण्यात आली. परंतु अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे छापा दिनांक ०६/०८/२०२५ रोजी मारण्यात आला. परंतु निशाणी क्र.२० वरील अहवालामध्ये नमुना मुद्देमाल दिनांक ०७/०८/२०२५ रोजी रासायनिक प्रयोगशाळेस प्राप्त झाले असे नमुद आहे. त्यामुळे दरम्यानच्या काळात जप्त नमुना कोणाच्या ताब्यात होता किंवा जप्त नमुन्यासोबत कोणतीही छेडछाड झाली होती किंवा कसे याबाबत शंका निर्माण होते.

७) त्याचप्रमाणे नि.२० वरील अहवालामध्ये एकूण ५ मुद्देमालांची तपासणी केल्याचे दिसून येते. परंतु अभियोगपक्षाच्या साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यामध्ये जप्त दारुचे ५ नमुने काढण्यात आले होते किंवा कसे याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. त्याचप्रमाणे अभियोगपक्षाच्या पंच साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे मुद्देमालाची जप्ती देखील निःसंशयपणे सिध्द झालेले नाही. त्यामुळे अभिलेखावरील पुरावा आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षास उपयुक्त नाही या मताप्रत मी आले आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

## <u>आदेश</u>

१. आरोपी नामे **<u>महेश रमेश चव्हाण</u>** यांना भा.ना.सु.संहितेचे २८७ नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) च्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने भा.ना.सु.संहितेचे कलम ४८१(१) नुसार अपील दाखल झाल्यास मा. अपीलीय न्यायालयात हजर राहणेसाठी ६ महिने मुदतीकरीता रक्कम रु.१५०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र देण्याचे आहे.

४. जप्त मुद्देमालाची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)**

SHABNAM YUNUS SHAIKH
Digitally signed by SHABNAM YUNUS SHAIKH
Date: 2026.08.10 17:51:10 +0530

**दिनांक :- १०/०८/२०२६** **(शबनम युनूस शेख)**

**स्थळ :- रत्नागिरी** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**न्यायालय क्र.२, रत्नागिरी.**

**प्रमाणपत्र**

''मी कथन करतो की,पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः बरोबर आहे''.

टंकलेखकाचे नाव :– एस.एन.कुलकर्णी

न्यायालयाचे नाव :– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.२, रत्नागिरी.

पी.डी.एफ दिनांक :–दि. १०.०८.२०२६

सांक्षाकित/–

लिपीक